पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १

सभावृत्तांत

दिनांक - ०२/०८/२०१४ वेळ - दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पहिली सभा (विशेष सभा) शनिवार दिनांक ०२/०८/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.प्रकाश कदम, उप आयुक्त (पुरवठा), पुणे विभाग, पुणे** व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.सौ.पानसरे अमिना महंमद
२. मा.काळभोर वैशाली जालिंदर
३. मा.जाधव साधना रामदास
४. मा.आल्हाट मंदा उत्तम
५. मा.बो-हाडे शुभांगी संजय
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.कुलकर्णी, - सहा.आयुक्त (नाविंयो), मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

( मा. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडणेसाठी कामाकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आली होती )

----------

**मा. उप आयुक्त (पुरवठा) -** सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत
**(पिठासीन अधिकारी)** महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केली आहे.

**मा.नगरसचिव** - विषय क्र.१ - मा.महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीची नेमणूक करणे.

मा. महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदासाठी नेमणूक करणेकामी एक नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.जाधव साधना रामदास | मा.काळभोर वैशाली जालिंदर | मा.आल्हाट मंदा उत्तम |

( मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एक नामनिर्देशन पत्र मा.पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्त केले. मा.पिठासीन अधिकारी यांनी त्याची छाननी केली )

**मा. उप आयुक्त (पुरवठा) -** मा.महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदासाठी
**(पिठासीन अधिकारी)** मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून ते निर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. सभापती महिला व बालकल्याण समिती पदाकरीता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नाव पुढील प्रमाणे आहे.

**१) मा.जाधव साधना रामदास**

कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकारी

यांचेकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल. अशी तरतूद असल्याने त्याप्रमाणे १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे.

(मा.पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला दु. १२.१० ते दु. १२.२५ हा १५ मिनिटांचा अवधी संपला.)

**मा. उप आयुक्त (पुरवठा)** - **(पिठासीन अधिकारी)** उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.जाधव साधना रामदास** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

----------

ठराव क्रमांक - ०१ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०२/०८/२०१४ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समिती सभापती पदासाठी एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले असून वैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा. महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.जाधव साधना रामदास** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.जाधव साधना रामदास** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

सही/-

**( प्रकाश कदम )**

उप आयुक्त (पुरवठा), पुणे

पिठासिन अधिकारी

महिला व बालकल्याण समिती

(विशेष सभा)

( नवनिर्वाचित सभापती **मा.जाधव साधना रामदास** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

----------

**मा.नगरसचिव** - विषय क्र.२ - मा.महिला व बालकल्याण समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

मा.महिला व बालकल्याण समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

ठराव क्रमांक - ०२ विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०२/०८/२०१४
सुचक : मा. मंदा आल्हाट अनुमोदक : मा.शुभांगी बो-हाडे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा. महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापतीची नेमणूक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३
दिनांक - ०२/०८/२०१४
सुचक : मा.अमिना पानसरे अनुमोदक : मा.संगिता पवार

मा. महिला व बालकल्याण समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या बुधवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी /

सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जाधव साधना रामदास )
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६३९/२०१४
दिनांक : ०२/०८/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.